# सिटी न्यूज अकोला

गुरुवार, दि. १९ मार्च २०२६ http://epaper.citynewssuperfast.com


## मुंडगावला मोफत आरोग्य तपासणी शिबीर

**अकोट:** मुंडगाव येथील सोपीनाथ महाराज मंदिरात मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. डॉ. पुरुषोत्तम मोकळकर यांनी बि.पी., ब्लड शुगर, पल्स रेट, ऑक्सिजन लेव्हल, तसेच मणक्याची गॅप गुडघ्याचे दुखणे इत्यादी आजारांची तपासणी करूण मिळेल. या संधीचा रूग्णांनी लाभ घ्यावा. शनिवार, २१ मार्चला सकाळी १० ते ५ पर्यंत स्थळ कुणबी समाज सभागृहात शिबीर होईल. आयोजक सोपीनाथ महाराज शिव मंदिर बहु. संस्था व कुणबी समाज प्रगती बहु. संस्था, गजानन वारकरी, अॅड. रवींद्र पोटे, अध्यक्ष रमेश आखरे, विक्रम आखरे, विजय आखरे, भास्कर आकोते, विवेक जयस्वाल, वासुदेव लहाने , आशिष लहाने, उमशे दोरकर, भरतसिंग आसोले, सदाशिव खरपकार, सुदर्शन खडसने ,माधव काठोके,रामरतन पाथ्रीकर, साहेबराव लोखंडे,दशरथ ठाकरे, सुनिल सदार,डिगांबर कुटे, कपिल वक्टे, विजय गावंडे, प्रदिप पुराळे, अशोक क्षीरसागर, प्रभाकर क्षीरसागर,गजानन वाढे,शरद प्रधान, ज्ञानेश्वर बुलबुले, संतोष भाकरे आदी आहेत. शिबिराचा लाभ घ्यावा असे आवाहन केले आहे.

## शुक्रवारी महानगरात रामदेवबाबा ध्वज यात्रा चे आयोजन



**अकोला:** लाखो भक्तांचे आराध्य रामसापीर रामदेवबाबा यांच्या ध्वज यात्रा व भजन संधेचे आयोजन करण्यात आले आहे. श्री रामदेवबाबा ध्वज यात्रा भक्त परिवारच्या वतीने व रामदेव बाबा श्यामबाबा सेवा समितीच्या सहकार्याने चैत्र शुक्ल द्वितीया शुक्रवार दिनांक २० मार्च रोजी सकाळी ७-३० वाजता आळशी प्लॉट येथील रामदेवबाबा मंदिर परिसरातून या ध्वज यात्रेस रामदेवबाबा यांच्या पूजन व आरतीने प्रारंभ होणार आहे.

## चेट्रीचंड महोत्सवास उत्स्फूर्त प्रतिसाद

**अकोला :** पूज्य सिंधी जनरल पंचायत अंतर्गत झुलेलाल महोत्सव समितीच्या वतीने सिंधी समाजाच्या चेट्रीचंड महोत्सवातील कार्यक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. १४ मार्च ते २० मार्च या कालावधीत आयोजित या रंगारंग महोत्सवाची सुरुवात सिंधी कॅम्प परिसरात भगवान झुलेलालच्या पूजन व सामूहिक आरतीने झाली. दरम्यान सिंधी कॅम्प परिसरातील कवरराम पुतळा प्रांगणात समाजाच्या युवती व महिलांचा भव्य गरबा रास पार पडला.सभापती सुधीर बेलानी व संपूर्ण टीमच्या नियोजनात यात अनेक महिलांनी सामूहिक गरबा खेळून आपल्या कलेची झलक दाखवली.रविवारी सकाळी कृषी विद्यापीठ परिसरातून झुलेलाल मॅरेथॉन पार पडली. सभापती दीपक जाधवानी यांच्या नियोजनात सम्पन्न यात समाजाच्या युवक-युवतींनी सहभाग घेऊन हा उपक्रम यशस्वी केला. त्यानंतर सिंधी कॅम्प येथील बाबा हरदासराम भवनात भव्य रक्तदान शिबिर झाले. लक्ष्मण पंजाबी, अमर सबलानी, सुनिल दुर्गीया, रोशन राज यांनी साकार या उपक्रमाला समाजाकडून चांगला प्रतिसाद मिळाला.दरम्यान समाजाच्या खेळाडूंसाठी बुद्धिबळ स्पर्धा व संध्याकाळी कवरराम प्रतिमा प्रांगणात मातृ-पितृ पूजन कार्यक्रम झाला.सभापती नरेश सचदेव व टीमने सहभागी मुलांना आपापल्या आई-वडिलांचे पूजन करून आशीर्वाद घेण्यास प्रोत्साहन दिले.

## जागतिक ग्राहक दिन सोमवारी

**अकोला:** जागतिक ग्राहक दिनानिमित्त सोमवार, दि. २३ मार्चला कार्यक्रम जिल्हाधिकारी कार्यालयातील काटेपूर्णा सभागृहात सकाळी ११ वाजता होणार आहे. यावेळी जागतिक ग्राहक दिनाची संकल्पना, ग्राहक हक्क आदी विविध विषयांवर मार्गदर्शन केले जाईल, अशी माहिती जिल्हा पुरवठा अधिकारी रवींद्र यन्नावार यांनी दिली. काटेपूर्णा सभागृह जिल्हाधिकारी कार्यालयाच्या इमारतीत तिस-या मजल्यावर आहे.

# संकृती संवर्धन शोभायात्रेने हिंदू नववर्षाचे स्वागत





**राजराजेश्वर मंदिर पासून शोभायात्रेचा शुभारंभ**

**अकोला:** शहरात सांस्कृतिक क्षेत्रात अग्रेसर असलेल्या संस्कृती संवर्धन समितीच्या वतीने अकोल्याचे आराध्य दैवत श्री राज राजेश्वर मंदिरातून गुढीपाडव्याला सकाळी हिंदू नववर्ष स्वागतासाठी शोभायात्रा काढण्यात आली. राजराजेश्वराची पूजा करण्यात आली. पारंपरिक वेशभूषेत समिती सदस्य तसेच नागरिक सहभागी झाले होते. शोभायात्रेचे ठिकठिकाणी स्वागत झाले.

पोलिस अधीक्षक अर्चित चांडक यांच्या प्रमुख उपस्थितीत शोभायात्रेचा शुभारंभ करण्यात आला.

प्रा. नितीन बाठे, संयोजक समीर थोडगे, सहसंयोजक स्वानंद कोंडोलीकर, राम भिरड, स्वागत समिती अध्यक्ष ब्रिजमोहन चितलांगे, उपाध्यक्ष डॉ. पार्थसारथी शुक्ल, रामप्रकाश मिश्रा, डॉ. आर. बी. हेडा, गोपाल खंडेलवाल, अ?ड. मोतीसिंग मोहता, प्रा. नरेंद्र देशपांडे, मंगेश वानखडे, हरिश अलिमचंदानी, अरविंद देठे, विनोद देव, अनिल गावंडे, निकेश गुप्ता, समर्थ शर्मा, पंकज सहगल, मनिष चंदनानी, महिला उपाध्यक्षा अर्चना शर्मा, पल्लवी रावणकर, डॉ. राधा पुरी, सोनल ठक्कर, रश्मी कायंदे, मीनाक्षी आपोतीकर, लता राठोड, महिला संयोजिका रेवती पांडे, सोनिया तऱ्हाळकर, मनीषा भुसारी, जयमाला खेडकर, विजया देशमुख, पुष्पा वानखडे, डॉ. स्नेहा गोखले, रुपाली धोत्रे, ऋतुजा पांडे, कोषाध्यक्ष शरद वाघ, अभयसिंग राजपूत यांच्यासह शेकडो नागरिक उपस्थित होते.

हिंदू नववर्ष स्वागत यात्रा राज राजेश्वर मंदिर, विठ्ठल मंदिर चौक, काळा मारोती, सिटी कोतवाली, गांधी चौक, तहसील ऑफिस, श्री राणी सती धाम, गुरुद्वारा न्यू राधाकिसान प्लॉट मार्गे अशोक वाटिका येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून मदनलाल धिंग्रा चौकातून टॉवर चौक, रतनलाल प्लॉट चौक, नेकलेस रोड मार्गे सिव्हिल लाइन चौकातून जवाहर नगर चौक, बारा ज्योतिर्लिंग मंदिर तेथून राऊत वाडी मार्गे जठारपेठ चौकातून संकल्प ढोल पथकाच्या सोबत सातव चौक मार्गे बिर्ला लेआऊट मधील जलाराम मंदिर येथून मार्गक्रमण करत समारोप बिर्ला राम मंदिरात समारोप झाला. आमदार रणधीर सावरकर, भाजपा महानगर अध्यक्ष जयंत मसने यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. येथे रामरक्षा पठण झाले. यात्रेच्या मार्गात येणाऱ्या सर्व मंदिरांना ध्वज प्रदान करण्यात आले. नगरसेवक निलेश देव यांनी नववर्षाच्या शुभेच्छा दिल्या. तसेच बिर्ला राम मंदिरात महाआरती होवून शोभायात्रेची सांगता झाली.





## खुन्नस खुन्नस मध्ये झाली हत्या ६ तासात पोलिसांनी अटक केले ३ आरोपी

प्रतिनिधी १९ मार्च





**अकोला:** डाबकी रोड पोलीस स्टेशनच्या हद्दीत घडलेल्या एका खळबळजनक खुनाच्या गुन्ह्याचा छडा लावण्यात अकोला पोलिसांना अवघ्या ६ तासांत यश आले आहे. याप्रकरणी पोलिसांनी ३ आरोपींना अटक केली असून, क्षुल्लक कारणावरून झालेल्या वादातून ही हत्या झाल्याचे समोर आले आहे.

१८ मार्च रोजी रात्री १२:०० वाजेच्या सुमारास, फिर्यादी शेख तनवीर शेख नासीर (१९, रा. भागवतवाडी) हे त्यांचा मित्र शेख मविस अमान याच्यासोबत सिगारेट पिण्यासाठी डाबकी रोडवरील एका पानटपरीजवळ गेले होते. तिथे आधीच उभे असलेले आरोपी अर्जुन नरेंद्र धनावत आणि त्याचे साथीदार यांच्याशी 'तू माझ्याकडे का बघतोस?' या कारणावरून वाद झाला. हा वाद विकोपाला गेल्याने आरोपींनी मविस अमान याला शिवीगाळ करत मारहाण केली. आरोपी अर्जुन धनावत आणि त्याच्या दोन साथीदारांनी मविसच्या पोटात चाकूने वार करून त्याला जागीच ठार केले. घटनेचे गांभीर्य ओळखून पोलीस अधीक्षक अर्चित चांडक व इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली डाबकी रोड पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवली.

तांत्रिक पुरावे आणि गोपनिय माहितीच्या आधारे पोलिसांनी ६ पथके तयार करून आरोपींचा शोध सुरू केला. अवघ्या ६ तासांत ३ आरोपींना ताब्यात घेण्यात आले. अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये आश्रय नगर डाबकी रोडचा अर्जुन नरेंद्र धनावत (२३ वर्षे), डाबकी रोड रेणुका नगर चा अनिकेत संजय बाळापुरे (१८ वर्षे), बाळापूर रोड गायत्री नगरचा विशाल दिलीप सिरसोले (२३ वर्षे) यांचा समावेश आहे. ही यशस्वी कारवाई पोलीस अधीक्षक, अपर पोलीस अधीक्षक आणि उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली.

## आलेगाव ते पिंप्री डिक्कर रस्त्यासाठी प्रहार व गावकऱ्यांचा टाळे ठोको आंदोलनाचा इशारा

प्रतिनिधी १९ मार्च




**अकोट :** आलेगाव ते पिंप्री डीक्कर रस्ता दुरुस्ती करणे बाबत आलेगाव ते पिंप्रि डीक्कर २० वर्षे पासून हा रस्ता नादुरुस्त असून गावकऱ्यांना व शाळा कॉलेज मध्ये जाणाऱ्या विद्यार्थ्यांना तसेच शेतकऱ्यांना शेती काम करण्यासाठी पावसाळ्यात दिवसात व इतरही दिवसांमध्ये खूपच बिकट परिस्थिती आहे. हा रस्ता ताबडतोब करण्यात यावा अन्यथा येत्या आठ दिवसांत गावकऱ्यांना सोबत घेऊन गावकरी व प्रहार जनशक्ति पक्ष बांधकाम विभागाला टाळे ठोको आंदोलन करू असा इशारा या निवेदनातून देण्यात आला.

गेल्या वीस वर्षाच्या कालावधीत आलेगाव ते पिंप्रि कर रस्ता हा प्रलंबित राहिला असून या रस्त्याची खडीकरण पूर्णतः उखडले आहे अक्षरशा रस्त्यावर पिवळी मातीला धूर उडत आहे रस्त्यावर मोठ मोठ्या खड्ड्यांचे साम्राज्य वाढते आहे व गावालगत खूप मोठा महाकाय खड्डा आमंत्रण जीव घेण्याला आमंत्रण देत आहे तरीही त्यावर बांधकाम विभागाचे लक्ष नसून कुठलीच साधी दिसून आली नाही या बांधकामाच्या भोंगळ कारभारामुळे अखेर समोरे यावे लागले, गावकऱ्यांना सह विद्यार्थ्यांना खूप त्रास सहन करावा लागत आहे वनी वारुळा, बळेगाव, देवरी, मुंडगाव, अशा मुख्य गावातील बरेच हजारोसंख्येचा रहदारीचा हा रस्ता असून गावातील पेशंट जर प्रसूतीसाठी या रस्त्याने नेताना त्या पिशव्यांचे काय हाल होत असतील तसेच शेतकऱ्याचे अन्य धान्य चे व कापसाचे ट्रॅक्टर या अनेक समस्यांना या गावकऱ्यांना समोरा जावे लागत आहे येथे आठ दिवसात बांधकाम विभागाने याची दखल घ्यावी निवेदन देतेवेळी प्रहार डजिल्हाअध्यक्ष कुलदीप वसु, गणेश गावंडे,प्रवीण वी. डीक्कर, रोहित डीक्कर, पवन भगत, किशोर मनतकर, किशोर गावंडे, पवन डीक्कर, आनंद डीक्कर, आकाश डीक्कर, कपिल डीक्कर, प्रदुमन डीक्कर मंगेश डीक्कर, शिवदास चिकटे, विक्की भगत, प्रदीप काठोले, शंतनु डीक्कर, केशव राक्षसकर, पीयूष अबगड , इतरही गावकरी व शेतकरी वर्गाने उपस्थित होते. गेल्या वीस वर्षा पासून आलेगाव ते पिंप्रि डीक्कर रस्ता हा प्रलंबित असून गावकऱ्यांना विद्यार्थांना खूप त्रास सहन करावा लागत आहे. येत्या आठ दिवसांत बांधकाम विभागाने याची दखल न घेतल्यास बांधकाम विभागाला कुलूप ठोकू असा इशारा प्रहार जिल्हा अध्यक्ष कुलदीप वसू यांनी इशारा दिला आहे.

## आदर्श महाविद्यालयात पदवीदान समारंभ; यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार

प्रतिनिधी १९ मार्च




**अकोला :** संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचा २०२५-२६ या सत्राचा ४२ वा पदवीदान समारंभ स्थानिक 'आदर्श कॉलेज ऑफ कॉम्प्युटर अँड मॅनेजमेंट' (गुप्ते रोड, जठारपेठ) येथे १७ मार्च २०२६ रोजी अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

कार्यक्रमाचा प्रारंभ संस्थेचे अध्यक्ष प्रा. विवेक डवरे व प्राचार्या डॉ. रक्षा डवरे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन आणि सरस्वती पूजनाने झाला. त्यानंतर विद्यापीठ गीताचे गायन करण्यात आले. प्राचार्या डॉ. रक्षा डवरे यांनी आपल्या प्रास्ताविक भाषणात महाविद्यालयाच्या प्रगतीचा आढावा मांडला. त्यांनी विद्यार्थ्यांच्या यशस्वी वाटचालीचा गौरव करतानाच, 'शिक्षणासोबतच मूल्याधिष्ठित संस्कारांची जपवणूक करा,' असे मोलाचे आवाहन विद्यार्थ्यांना केले.'विद्यार्थ्यांनी केवळ पदवी घेऊन थांबू नये, तर परिश्रम, चिकाटी आणि सामाजिक जबाबदारीचे भान राखून देशाच्या विकासात योगदान द्यावे.' असे मत यावेळी संस्था अध्यक्ष प्रा. विवेक डवरे यांनी व्यक्त केले.

या समारंभात महाविद्यालयातील विविध शाखांच्या विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करून सन्मानित करण्यात आले. बी.बी.ए.,बी.सी.ए.,बी.कॉम.,एम.कॉम. - कॉम्प्युटर मॅनेजमेंट यावेळी विशेष आकर्षण म्हणजे 'स्वप्नांना साकार रूप देत नोकरीत स्थिरावलेल्या माजी विद्यार्थ्यांचा' विशेष अभिनंदन सोहळा. मान्यवरांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन या यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. गायत्री भुस्कुटे यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. अरुणा नावकार यांनी मानले. राष्ट्रगीताने या प्रेरणादायी सोहळ्याची सांगता झाली. याप्रसंगी महाविद्यालयातील सर्व गुणवंत विद्यार्थी, पालक, शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## वसंत संपात अर्थात महाविषुव दिन

प्रतिनिधी १९ मार्च

**अकोला :** दररोज पूर्वेला उगवणारा सूर्य निश्चित पूर्वेला फक्त विषुवदिनी असतो.म्हणूनच वर्षातील २० किंवा२१मार्च आणि २२ किंवा २३ सप्टेंबर या वसंत व शरद संपात दिनी सूर्य पृथ्वीच्या उत्तर वा दक्षिण गोलार्धाच्या मधील विषुववृत्तावर असतो.या दिवशी दिवसरात्र समान लांबीचे असतात.नंतर यात बदल होत जाऊन २१ जून उत्तर गोलार्धात सर्वात मोठा दिवस तर दक्षिण गोलार्धात या दिवशी सर्वात मोठी रात्र असते. दोन्ही ध्रुवावर दिवसरात्र सहा महिन्यांची असते. आता उत्तर ध्रुवावर सहा महिन्यांचा दिवस सुरु होईल. सामान्यतः आपण चार मुख्य व चार उप दिशांचा वापर करतो परंतु भौगोलिकदृष्ट्या दर सव्वा अकरा अंशावर एक सह दिशा बदलत असून एकूण दिशांची संख्या ३२ असते. पृथ्वी परिभ्रमण करतांना कलून फिरत असल्याने सूर्य उदयास्त स्थान, वेळ व ऋतूचक्र बदलते.सूर्य नेमका २१ जूनला पृथ्वीच्या कर्कवृत्तावर तर २२ डिसेंबरला मकर वृत्तावर असतो.यालाच उत्तरायण व दक्षिणायन म्हणतात. प्रत्येक वर्षात दोन विषुवदिन व दोन अयनदिन असे चार दिवस महत्वाचे असतात.सोबतच आणखी एक महत्त्वाचा दिवस म्हणजे सूर्य नेमका आपल्या डोक्यावर असतो.हा दिवस फक्त पृथ्वीच्या साडे तेविस अंश उत्तर - दक्षिण या पट्ट्यातील अक्षवृत व रेखावृत लक्षात घेऊन अनुभवता येतो.यालाच शून्य सावली दिवस म्हणून म्हणतात. माध्यान्हाचे वेळी आपली सावली काही वेळ नाहिशी होत असते.

## ऐकोप्याची परंपरा मूर्तिजापूरकरांनी कायमच ठेवावी - एस डीओ संदीपकुमार अपार

प्रतिनिधी १९ मार्च



**मुर्तीजापुर :** तालुका प्रतिनिधी फोटो अधिकारी येथील जातील प्रत्येक जाती धर्माचे लोक एकमेकांच्या सणात सहभागी होतात आदर सन्मान ठेवून शासन प्रशासनाला सहकार्य करतात या शहराच्या ऐकोप्याची परंपरा मूर्तिजापूरकरांनी कायमच ठेवावी असे प्रतिपादन मुर्तीजापुर येथील आयोजित इफ्तार पार्टी कार्यक्रमात उपविभागीय अधिकारी संदीप कुमार अपार आपले मनोगत व्यक्त करताना बोलत होते. नगरसेवक इब्राहिम घाणीवाला . निजाम इंजिनियर यांचे पुढाकाराने ईदगा मज्जित या ठिकाणी सर्व धर्मीय इफ्तार पार्टीचे कार्यक्रम आयोजन करण्यात आले होते या कार्यक्रमाचे एसडीओ संदीप कुमार अपार तहसीलदार शिल्पा बोबडे ठाणेदार अजित जाधव माजी नगराध्यक्ष द्वारकाप्रसाद दुबे मौलाना जफर खतीब, कमलाकर गावंडे नगरपरिषद उपाध्यक्ष रोहित अवलवार यांनी कौतुक केले. उपस्थित मान्यवरांचा शाल आणि पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आला कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पत्रकार अन्वर खान यांनी केले तर आभार इंजिनियर रजा घाणीवाला यांनी केले यावेळी नगरसेवक सचिन देशमुख संदीप सरनाईक राहुल गुल्हाने पंकज कांबे राम खंडारे राहुल पाटील पप्पू तिडके राम कोरडे सद्दाम पटेल रवी माडकर नितीन गायकवाड कैलास महाजन नासिर ठेकेदार अतिश महाजन संजय गुल्हाने छोटू मेकॅनिकल सय्यद राजीम मन्सूर राही उपनिरीक्षक आशिष शिंदे हेड कॉन्स्टेबल शेख साजिद व इतर हिंदू मुस्लिम बांधव या कार्यक्रमाला मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

## बसस्थानकावर अंगणवाडी सेविकेचे ९० हजारांचे दागिने चोरी

वि.प्रतिनिधी १९ मार्च

**अकोट :** शहरातील बसस्थानकावर गर्दीचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने अंगणवाडी सेविकेच्या पर्समधील सुमारे ९० हजार रुपयांचे सोन्याचे दागिने लंपास केल्याची घटना घडली. गुढीपाडव्याच्या पार्श्वभूमीवर घडलेल्या या प्रकारामुळे नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. अकोट तालुक्यातील अकोलखेड येथील मंगला निळकंठ चोंडेकर या अंगणवाडी सेविका १८ मार्च रोजी दुपारी साडेतीन वाजताच्या सुमारास आपल्या मुलासह बुलढाणा जिल्ह्यातील बावनबीर-टुनकी येथे जाण्यासाठी अकोट बसस्थानकावर आल्या होत्या. जळगावकडे जाणाऱ्या बसमध्ये चढत असताना गर्दीचा फायदा घेत अज्ञात व्यक्तीने त्यांच्या थैलीतील पर्समधून दागिने चोरून नेले. चोरीस गेलेल्या दागिन्यांमध्ये दहा ग्रॅम सोन्याची चैन, तीन ग्रॅमची अंगठी, दोन ग्रॅमचे कानातले तसेच सोन्याचे मणी व डोरले यांचा समावेश असून एकूण किंमत सुमारे ९० हजार रुपये आहे. या प्रकरणी अकोट शहर पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल करण्यात आली असून पोलिसांनी गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे. बसस्थानक परिसरातील सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे संशयिताचा शोध घेण्याचे काम सुरू आहे.


**कार्यालय नगर परिषद, पातुर**

**ता.पातूर, जि. अकोला**

(ई निविदा सुचना)

क्रमांकः नपपा/ बांध/वि/१६२/२६
दिनांकः १८/३/२६

मुख्याधिकारी नगर परिषद पातूर ता. पातुर जि. अकोला यांचे वतीने जिल्हा वार्षिक योजना २०२५-२६ अंतर्गत कामांच्या बि-१ दोन लिफाफा ई निविदा पद्धतीने महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाचे योग्य त्या वर्गातील पंजिबद्ध कंत्राटदाराकडून निविदा मागविण्यात येत आहे. वरील योजनेच्या विकास कामाची निविदा केवळ ई- निविदा पद्धतीने सादर करावयाच्या आहेत. निविदेचा विस्तृत नमुना अटी व शर्ती सह महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या वेबसाईडवर दिनांक १९/३/२०२६ पासून पाहण्यास उपलब्ध आहेत.

**मुख्याधिकारी**
**नगर परिषद पातुर**